भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये  Rs. 100

रु. 100  ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA  2024  06AB 884221

GOVT. OF MAHARASHTRA
31 JUL 2024

## सामंजस्य करार

## MEMORANDUM OF UNDERSTANDING

कॉलेज नाव 1) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज

आणि

कॉलेज नाव 2) राजे रामराव महाविद्यालय, जत

ज्ञानसाहित्याचे संग्रहण, जतन, संवर्धन विकसन, अध्ययन व अध्यापनात विविध ज्ञान साहित्यांद्वारे मदत करणे आणि संशोधनास सहाय्य करणे, मार्गदर्शन करणे हे ग्रंथालयाचे ध्येय आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक यांना त्यांच्या मागणीनुसार विविध ग्रंथालयीन सेवा ग्रंथालयामार्फत दिल्या जातात. ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. ग्रंथालयाची सतत वाढ व विकास अखंड सुरू असतो. दोन ग्रंथालयांना एकमेकांच्या सहाय्याने वाचकांच्या गरजा पूर्ण करणे हे क्रमप्राप्त ठरते.

उपलब्ध ज्ञानसाहित्याची देवाणवाणघे-, माहिती व ज्ञानस्त्रोतांचा अधिकाधिक उपयोग, चर्चासत्रे,परिसंवाद कार्यशाळा, आंतरग्रंथालयीन देवाण-घेवाण, प्रशिक्षित मनुष्यबळाच्या ज्ञानाचा उपयोग, संशोधनात्मक माहितीची देवाणघेवाण विविध स्पर्धा-, ग्रंथालय नेटवर्क या व अन्य उपक्रमांसाठी सामंजस्य करार उपयुक्त ठरतो.

उपरोक्त नमूद केलेल्या कॉलेज 1 व 2 दोन महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार दि .७/८/२०२४ रोजी होत आहे.या कराराची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत .

१) विविध ग्रंथसंपदेची आवश्यकतेनसार देवाण-घेवाण करणे

२) संशोधनासाठी एकमेकांना सहाय्य करणे, मार्गदर्शन करणे.

३) विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

४) चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, ग्रंथालय संमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

५) ग्रंथालय प्रमाणपत्र कोर्स, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यासाठी सहकार्य करणे.

६) वाचन चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणे, व्याख्यानांचे आयोजन करणे

७) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राला सहकार्य करणे, आवश्यक त्या ग्रंथांची मदत करणे.

८) व्यक्तिमत्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

९) संशोधनात्मक लेखन, संशोधन पेपर, प्रबंध लेखन, दुर्मिळ साहित्याच्या माहितीचे , यासाठी मदत करणे.

Scanned with CamScanner

फक्त प्रतिज्ञा पत्रासाठी (अनुच्छेद-४) Only For Affidavit

प्रतिज्ञापत्र कोणाकडे सादर करावयाचे -

प्रतिज्ञापत्राचे कारण - MOU

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव - डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय

मुद्रांक विकत घेणाऱ्याचा पत्ता -

मुद्रांक विक्री नोंद वही अनु क्रमांक - दिनांक 1 AUG 2024

मुद्रांक विक्रेत्याची सही -

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही -

मुद्रांक विक्रेत्याचे नाव - श्री. ...

मुद्रांक विक्रीचे ठिकाण - ..., मिरज.

१०) एकमेकांच्या ग्रंथालयांना ग्रंथपाल, प्राध्यापक, सेवक, वाचक यांनी भेटी देऊन माहितीचे, ज्ञानाचे आदान-प्रदान करणे. पालक उद्बोधन वर्गाचे आयोजन करणे.

११) प्रश्नपत्रिका संच, नियतकालिके, वृत्तपत्रे यांची देवाण-घेवाण करणे.

१२) ऑनलाईन - ऑफलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना ग्रंथालये व ज्ञानस्त्रोत यांच्या अनुषंगाने मार्गदर्शन करणे.

उपरोक्त नमूद केलेल्या १ व २ दोन महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार दि .७/८/२०२४ रोजी होत आहे. या कराराची अटी व नियम खालीलप्रमाणे असतील.

**अटी / नियमावली:**

१) दरमहा आपापल्या कॉलेजकडून एकमेकांना २५ पुस्तके, ग्रंथ उपलब्ध होऊ शकतील.

२) उपलब्ध झालेल्या पुस्तकांची, ज्ञानसाहित्याची जबाबदारी एकमेकांवर असेल.

३) आपापल्या खर्चाचे एकमेकांना सहकार्य करणे.

४) परस्पर सामंजस्य करारातील उदाहणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारानी कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सुचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

५) कोणत्याही महाविद्यालयास प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

६) सदर परस्पर सामंजस्य कारारांचा कालावधी दहा वर्षानंतर संपुष्टात येईल.

७) परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षांनी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

८) यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती याची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय :**

१) सदर कराराची जबाबदारी समन्वय आणि अंमलबजावणीसाठी उपरोक्त नमूद केलेल्या १ व २ महाविद्यालय. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून ग्रंथपाल काम करतील.

२) सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटींशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.

३) खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यांत होत आहे. तसेच वर नमूद केलेल्या दिनांक ७/८/२०२४ अंमलात येत आहे.

कॉलेज १) ग्रंथपाल — **ग्रंथपाल, शि. म. डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज.** प्राचार्य — **प्राचार्य, शि. म. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज मिरज. जि. सांगली - ४१६ ४१०**

कॉलेज 2) ग्रंथपाल — **ग्रंथपाल, राजे रामराव महाविद्यालय, जत.ता.जत,जि.सांगली.** प्राचार्य — **प्राचार्य, राजे रामराव महाविद्यालय जत. जि. सांगली.**

कॉलेज 1) शिक्का — S.M.DR. BAPUJI SALUNKHE COLLEGE MIRAJ SI-9

कॉलेज 2) शिक्का — राजे रामराव महाविद्यालय, जत, जि. सांगली स्थापना १९६१

Scanned with CamScanner